| Article Date | Headline / Summary | Publication |
| --- | --- | --- |
| 01 Jun 2026 | The Role of Insurance in Climate Resilience | Prabhat (Marathi) |




उष्णतेशी संबंधित आजार झपाट्याने गंभीर रूप धारण करू शकतात आणि हृदय, मेंदू तसेच किडनी यासारख्या अवयवांवर परिणाम करू शकतात. हेल्थ इन्श्युरन्स हा वाहतूक, वैद्यकीय उपचार, चाचण्या, औषधे आणि पोस्ट-हॉस्पिटलायझेशन खर्च असा आपत्कालीन खर्च कव्हर करण्यास मदत करतो.

**उष्णतेशी संबंधित आजारांसाठी कव्हरेज**

इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये सामान्यत: ॲम्ब्युलन्स किंवा एअर ॲम्ब्युलन्स यासारख्या आपत्कालीन वाहतूक सेवा कव्हर केल्या जातात. अति उष्णतेमुळे उद्‌भवणाऱ्या समस्या, जसे की उष्माघात, अतिसार, जठराचा व आतड्याचा तीव्र दाह, उष्णतेमुळे येणारे पेटके, त्वचेवर पुरळ उठणे आणि डिहायड्रेशन हे स्टँडर्ड हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये हॉस्पिटलायझेशन अंतर्गत कव्हर केले जातात.

डिहायड्रेशन किंवा उष्माघात सारख्या गंभीर उष्णतेशी संबंधित आजाराच्या बाबतीत, हॉस्पिटलायझेशन आवश्यक असू शकते. हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये सामान्यतः अशा उपचारांसह डॉक्टरांचा सल्ला, नर्सिंग केअर, औषधे आणि हॉस्पिटलमधील राहण्याचा खर्च कव्हर केला जातो.

काही पॉलिसींमध्ये उत्पन्नाच्या नुकसानाची भरपाई दिली जाते, ज्यामध्ये व्यक्ती हॉस्पिटलमध्ये दाखल असताना आणि काम करण्यास असमर्थ असताना दररोज एक निश्चित रक्कम दिली जाते.

पोस्ट-हॉस्पिटलायझेशन केअर, जसे की फॉलो-अप अपॉईंटमेंट, अत्यावश्यक औषधे आणि प्रगतीचे निरीक्षण, ही मान्य करण्यात आलेल्या आजाराच्या हॉस्पिटलायझेशनशी संबंधित असून, ती पॉलिसीमध्ये समाविष्ट आहेत.हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये निवडलेल्या प्लॅननुसार प्री- आणि पोस्ट-हॉस्पिटलायझेशनचे ३० ते १८० दिवसांचे खर्च कव्हर केले जातात.

**पॅरामेट्रिक इन्श्युरन्स**

भारतातील सुमारे ४६.१% लोक कृषी क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत, तर २०२०-२१ मध्ये सुमारे ७७ लाख लोक गिग अर्थव्यवस्थेचा (तात्पुरत्या कामांवर आधारित अर्थव्यवस्था) भाग होते. ही दोन्ही क्षेत्रे उष्णतेच्या लाटांमुळे प्रभावित होतात. अशा कामगारांसाठी, अति-उष्णतेमुळे कामाचा एका दिवस गमावणे म्हणजे उत्पन्न नुकसान होणे, तसेच आरोग्य आणि आर्थिक जोखमींनादेखील सामोरे जावे लागणे होय.

पॅरामेट्रिक इन्श्युरन्स हे इंडेक्स-आधारित मॉडेल असून, तापमान ठराविक मर्यादेपेक्षा जास्त झाल्यास ऑटोमॅटिकरित्या पेआऊट देऊन संरक्षण प्रदान करतो. त्यामुळे कोणत्याही क्लिष्ट क्लेमशिवाय नुकसानभरपाई मिळते.

हेल्थ आणि पॅरामेट्रिक इन्श्युरन्स सारख्या उपायांचा वापर केल्याने उष्णतेची लाट यासारख्या हवामानाशी संबंधित जोखमींपासून आवश्यक हेल्थकेअर सुविधा आणि आर्थिक संरक्षण दोन्ही मिळते. हेल्थ इन्श्युरन्समुळे कन्सल्टेशन्स, स्क्रीनिंग्स आणि प्रतिबंधात्मक सेवा याद्वारे वेळेवर उपचार मिळतात, ज्यामुळे गंभीर गुंतागुंत होण्याचा धोका कमी होतो. दुसरीकडे, पॅरामेट्रिक इन्श्युरन्स हे कृषी आणि गिग कामगार यांच्यासाठी उपयुक्त ठरते. तापमान ठराविक मर्यादेपेक्षा जास्त झाल्याने काम थांबल्यास या इन्श्युरन्स अंतर्गत ऑटोमॅटिकरित्या पैसे मिळतात, ज्यामुळे उत्पन्न आणि आरोग्य दोन्हीचे संरक्षण होते. हे दोन्ही उपाय एकत्रितपणे दुहेरी संरक्षण कवच तयार करतात, ज्यामुळे आर्थिक स्थैर्य वाढते, उपजीविका सुरक्षित होते आणि दीर्घकालीन आरोग्याला पाठबळ मिळते. उष्णता लाटेच्या घटना अधिक वारंवार आणि तीव्र होत असताना, सर्वसमावेशक हेल्थ कव्हरेज आणि पॅरामेट्रिक इन्श्युरन्स यांसारखे आधुनिक उपाय स्वीकारणे हे बदलत्या हवामानात सुरक्षित राहण्यासाठी अत्यावश्यक देखील आहे.

**- अमरनाथ सक्सेना,**
चीफ टेक्निकल ऑफिसर
कमर्शियल, बजाज जनरल इन्श्युरन्स